REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख १४ ऑगस्ट, १९४० अंक ३३

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए. (कँटब), बार–अँट–लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील अँड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहाहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
ग्रेट सोशल लाईफ अँण्ड जनरल अॅशुरन्स लिमिटेड.
ब्रँच ऑफिस–लक्ष्मीरोड, पुणें. ऽ एजन्सीकरितां आजच लिहा. ऽ हेड ऑफिस–जळगांव, पू. खा.

पूर्ण स्वदेशी
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्यांच्या उपयुक्त
विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा, विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

**वेड्यांचीं इस्पितळें**

मुंबई इलाख्यांतील वेड्यांच्या पांच इस्पितळांत ९,१८७ व्यथितांची रहाण्याची सोय आहे. तथापि, येरवड्याच्या इस्पितळांत २५० अधिक रोग्यांची जादा सोय करण्यांत आली आहे तरीहि सर्वत्र गर्दी झालेली आहे. १९३९ साठीं १६९ इसमांची, त्यांची स्थिति पुन्हां बिघडल्यास परत इस्पितळांत जाण्याच्या अटीवर सुटका करण्यांत आली आणि त्या इसमांच्या नातेवाइकांनीं त्यांस आपणांकडे ठेवून घेतलें आहे. त्या वर्षी ३३७ रोगी बरे झाले म्हणून सोडले गेले, ९१ इसमांत सुधारणा झाल्यानें मुक्त केले गेले आणि २०७ जणांस इतर कारणांमुळें सोडून देण्यांत आलें.

**अमेरिकन कपाशीची पैदास**

या हंगामांत अमेरिकन कापसाचें पीक ११४ लक्ष गाठीं होईल असा अंदाज आहे.

**इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट लि. पुणें.**

पुणें येथील इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट लि. ची पहिली सर्वसाधारण सभा गेल्या बुधवारीं प्रो. काळे ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. वृत्तांत व ताळेबंद मान्य होऊन तीन टक्के डिव्हिडंड वाटण्याचें ठरलें. डायरेक्टरांच्या निवडणुकी व ऑडिटरची नेमणूक हीं कामेंहि झालीं. कंपनीनें पहिल्याच वर्षी डिव्हिडंड दिलें ही समाधानाची गोष्ट आहे.

**नवयुग चित्रपट लि. चा तिसरा चित्रपट**

नवयुग चित्रपट लिमिटेडच्या तिसऱ्या चित्रपटाच्या प्रारंभाचा समारंभ कोल्हापुरास गेल्या गुरुवारीं झाला. प्रो. काळे, चेअरमन, श्री. साठे, डायरेक्टर व श्री. राजगुरू, सेक्रेटरी समारंभास उपस्थित होते.

**अमेरिका-सोव्हिअट व्यापारी करार**

सोव्हिअट रशिया व अमेरिका ह्यांचेमध्यें व्यापारी करार नुकताच झाला आहे. त्या अन्वयें रशियानें ४ कोटि डॉलर्स इतक्या किंमतीचा अमेरिकेचा माल दरवर्षी खरेदी करावयाचा आहे.

**आगी विझवण्याची पूड**

बॉंबच्या योगानें लागणाऱ्या आगी विझवण्याची एक पूड इंग्लंडमध्यें शोधून काढण्यांत आली आहे. ती स्वस्त मिळेल आणि तिचा पुरवठा विपुल होईल.

**पर्जन्य आणि वृक्षारोपण**

दुष्काळाची भीति दूर व्हावी म्हणून झाडें लावून पर्जन्य आकर्षण्याच्या हेतूनें काठेवाडांत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याची चळवळ चालू झाली आहे.

**बावीस लक्ष रुपयांची सारासूट**

मुंबई प्रांताच्या जमीन महसुलाबाबतच्या रिपोर्टावरून असें दिसतें कीं त्या वर्षी सरकारनें २२ लक्ष रुपयांची सारासूट दिली. ६२ लक्ष रुपयांची सारावसुलीची तहकुबीहि देण्यांत आली. दिलेल्या तगाई कर्जांची रकम सव्वासात लक्ष रुपये होती.

**कर आणखी वाढवा!**

कॉमन्स सभेंत ब्रिटिश फडनविसांनीं जादा बजेट मांडलें असतां तें अपुरें असून आणखी करवाढ झाली पाहिजे अशी टीका कांहीं सभासदांनीं केली.

**अमेरिकन तेलाच्या निर्गतीस बंदी**

विमानांस लागणारें तेल बाहेर पाठवण्याची अमेरिकेंत बंदी झाली आहे. अमेरिका संडाच्या संरक्षणाचे दृष्टीनें ही बंदी आवश्यक आहे असें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं समर्थन केलें.

**ट्रेझरी बिलांवर १२ आणे ११ पै व्याज**

गेल्या आठवड्यांत दोन कोटि रुपयांचीं तीन महिने मुदतीचीं हिंदी सरकारचीं ट्रेझरी बिलें स्वीकारण्यांत आलीं. त्यांवर द. सा. द. शे. १२ आणे ११ पै इतका व्याजाचा दर सरासरीनें बसला.

**जादा नफ्यावरील करासंबंधीं अपिलें**

जादा नफ्यावरील कराचे संबंधांत कर आकारणी विरुद्ध होणाऱ्या अपिलांचा निकाल करण्यासाठीं, करावाबतच्या कायद्यांत पंचांची तरतूद करण्यांत आली आहे. ह्या "बोर्ड ऑफ रेफरीज" मध्यें निम्मे सभासद बिनसरकारी असले पाहिजेत अशी योजना आहे. ह्या सभासदांच्या निवडणुकीचे संबंधांत व्यापारी मंडळांकडून सूचना मागवण्यांत येत आहेत.

**मोठ्यांचें सगळेंच मोठें!**

अमेरिकन राष्ट्र इतकें संपत्तिमान आहे कीं त्याच्या सरकारचें उत्पन्न व खर्च हीं अवाढव्य असतात. लष्करी संरक्षणाचा खर्च प्रचंड प्रमाणांत होत असून यंदाच्या जमाखर्चांतली तूटहि तशीच मोठी आहे. १९४१, एप्रिल अखेर पुऱ्या होणाऱ्या बारमाहींत अमेरिकन सरकारचा खर्च ३,६०० कोटी रुपयांचे वर होईल आणि त्यामुळें बजेटांत तूट सुमारें १,७५० कोटि रुपये येईल असा अंदाज आहे.

**लढाऊ विमानांचें अमेरिकन उत्पादन**

अमेरिकेंत लढाऊ विमानांचें उत्पादन झपाट्यानें वाढत आहे. दर वर्षास १०,८०० विमानें ह्या प्रमाणावर तें आतां आलें असून पुढील जानेवारीच्या सुमारास तें १८,००० वर जाईल.

**स्वदेशी साखरेचें उत्पादन**

हिंदी व ब्रह्मी अशा १३९ साखरेच्या कारखान्यांत १९३९-४० च्या हंगामांत ३ कोटि, ३३ लक्ष मण साखर तयार झाली असा अंदाज आहे. ह्यांत संयुक्त प्रांताचा हिस्सा सर्वांत मोठा आहे. तेथील कारखान्यांत १ कोटि, ८५ मण टन साखर तयार झाली. त्याच्या खालोखाल बिहारच्या ८६ लक्ष मणांचा नंबर लागतो. मुंबई व सिंध ह्यांचें उत्पादन २३ लक्ष मण झालें. उसापासून निघालेल्या साखरेचें प्रमाण ९.८ टक्के इतकें सरासरीनें भरलें.

**चाळीस कोटी रुपयांची हिंदी युद्धसामुग्री**

हिंदुस्थान सरकारच्या युद्ध-पुरवठा खात्याचे मार्फत गेल्या नऊदहा महिन्यांत चाळीस कोटि रुपये किंमतीच्या मालाची खरेदी ह्या देशांत झाली आहे.

**पांच कोटि रुपयांचा कपास गिरण्यांचा माल खरेदी**

गेल्या दहा महिन्यांत युद्धासाठीं लागणाऱ्या कापड, सूत, नवार, पट्टे इत्यादि कापसाचा माल पांच कोटि रुपये किंमतीचा ह्या देशांत खरेदी करण्यांत आला आहे. ह्या पुरवठ्यांत मुंबईच्या गिरण्यांचा मोठा हिस्सा आहे.

**व्यवसायांचीं नांवें**

निरनिराळ्या व्यवसायांत हजारो भिन्नभिन्न कृति असतात आणि त्यांस व त्या करणारांस विशिष्ट नांवें पडतात. अमेरिकेंत त्यांचा एक शब्दकोश तयार करण्यांत आला आहे. त्यामध्यें एकूण १७,४५२ कृति व त्यांचीं २९,७४४ नांवें बसून झालीं आहेत.

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३८६ |
| २ आर्थिक घडामोडींचा आढावा ... | ३८७ |
| ३ हिंदी चलन व्यवस्थेचा वृत्तांत ... | ३८८ |
| ४ स्फुट विचार ... | ३८९ |
| स्थानिक स्वराज्य संस्थां-विषयींचे प्रश्न-शेंगदाणा आणि आळशी-सहकार, तत्त्व आणि व्यवहार— जर्मनांची व्यर्थ धडाई— स्पुएझ कालव्याची किल्ली ब्रिटिशांच्या हातांत | |
| ५ शिक्षण पद्धतीस व्याव-हारिक वळण लावा | ३९१ |
| ६ व्हाइसरॉयांनीं केलेली घोषणा ... | ३९२ |
| ७ शेडयूल्ड बँकांची परिस्थिति ... | ३९२ |
| ८ जपानी रेशीम | ३९३ |
| ९ युद्धाची हालहवाल ... | ३९४ |
| १० मुंबईच्यां बाजारांतील घडामोडी ... | ३९५ |
| ११ निवडक बाजारभाव | ३९५ |

# अर्थ

बुधवार, ता. १४, ऑगस्ट १९४०

## आर्थिक घडामोडींचा आढावा.

### रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांचें भाषण

रिझर्व्ह बँकेच्या सहाव्या साधारण सभेचे प्रसंगीं तिचे गव्हर्नर, सर जेम्स टेलर, ह्यांनीं आपल्या भाषणांत हिंदुस्थानचा व्यापार, उद्योगधंदे व सर्वसाधारण सांपत्तिक परिस्थिति ह्यांच्यावर झालेल्या व होणाऱ्या युद्धाच्या परिणामांचें सिंहावलोकन केलें. रिझर्व्ह बँकेच्या कार्याचा उद्योगधंदे, व्यापार, चलन, हुंडणावळ इत्यादि आर्थिक महत्त्वाच्या बाबींशीं निकट संबंध येतो. ह्यामुळें त्या बँकेच्या कारभाराचा वृत्तांत सांगतांना तिच्या चालकांस देशांतल्या आर्थिक घडामोडींचा आढावा घेणें युक्त व आवश्यक आहे. सर जेम्स टेलर ह्यांच्या भाषणांतील प्रमुख मुद्यांचा परामर्श येथें घेतला असतां तो बोधप्रद होण्यासारखा आहे. त्यांनीं उल्लेखिलेली पहिली महत्त्वाची बाब हिंदुस्थानच्या निर्गत व्यापाराच्या मार्गांत आलेल्या अडथळ्यासंबंधाची होती. युरोपखंडाशीं होणारी ह्या देशाची देवघेव बंद पडल्यासारखी झाली आहे. शत्रुराष्ट्रें व तटस्थ देश ह्यांच्याशीं शांततेच्या काळीं व्यापार होत असे, तो आतां अशक्य झाल्यानें त्या व्यवहाराची जागा कशी भरून काढावयाची हा कठिण प्रश्न उत्पन्न झाला आहे. इंग्लंड व साम्राज्यांतील इतर देश ह्यांतील बाजारपेठांवर हिंदुस्थानास अवलंबून रहावें लागत आहे आणि त्यांची मागणी अपुरी असल्यानें शेतीच्या व इतर कच्च्या मालाचे भाव पडले आहेत. समुद्रमार्गानें होणाऱ्या वाहतुकीची अडचणहि परराष्ट्रीय व्यापारास व्यत्यय करीत आहे. सर जेम्स टेलर ह्यांच्या मतें ह्या स्थितीवर उपाय हिंदुस्थानांतच कच्च्या मालाचा उपयोग कारखान्यांत करून त्याचा पक्का माल बनवणें हा आहे. युद्धसामुग्री तयार करण्यासाठी हिंदी सरकार देशांतील कारखान्यांस उत्तेजन देऊन स्वदेशी मालाच्या उत्पादनाचा विस्तार होण्यास सहाय करीत आहे. हिंदुस्थान आर्थिक स्वावलंबनाच्या मार्गास लागला आहे आणि केवळ युद्धोपयोगीच नव्हे तर इतर माल तयार करून तो औद्योगिक प्रगतीचा मोठा पल्ला गाठील अशी आशा सर जेम्स ह्यांनीं व्यक्त केली आहे. युद्धोत्तर औद्योगिक संरक्षणाचें धोरण कोणतें राहील ह्यावर सदरहू आशा तृप्त होणें अवलंबून रहाणार आहे, हें उघड आहे. युद्ध संपल्यावर जगाची आर्थिक घडी बसेल तीमध्यें हिंदी उद्योगधंद्यांस स्वतंत्र व सुरक्षित स्थान मिळेल तरच त्यांची उन्नति टिकणार आहे.

व्यापाराच्या मार्गांत अशा अडचणी असतांनाहि चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत हिंदुस्थानाच्या आयात-निर्गतीचा आढावा अत्यंत समाधानकारक असाच झालेला आहे. निर्गत व्यापार अनुकूल प्रमाणांत झाल्या कारणानें त्यामध्यें निघालेल्या स्टर्लिंग पौंडांतल्या हुंड्या सव्वाचार कोटि पौंड किंमतीपर्यंत रिझर्व्ह बँकेस विकत घेतां आल्या. हिंदी सोन्याची व तागाच्या मालाची विक्री अमेरिकेंत झाली, तिची किंमत डॉलरमध्यें ह्या देशास मिळावयाची होती. हे डॉलर किंवा डॉलर मधल्या हुंड्या रिझर्व्ह बँकेनें ब्रिटिश सरकारास पौंड स्टर्लिंगच्या मोबदल्यांत विकल्या. बेल्जम व फ्रान्स ह्या देशांत निकराच्या लढाया चालल्या होत्या, तेव्हां ब्रिटिश सरकारास अमेरिकेंतून लढाऊ सामुग्रीबद्दल द्याव्या लागणाऱ्या किंमतीचे डॉलर देणें आवश्यक होतें. हिंदुस्थानकडून स्टर्लिंग देऊन विकत घेतलेल्या डॉलरमधल्या हुंड्या ह्या रीतीनें ब्रिटिश सरकारास युद्धकार्यांत ऐनवेळीं उपयोगी पडल्या. हिंदुस्थानचें युद्धाचे बाबतींत हें सहाय झालें. त्या बाबतींत ब्रिटिश राष्ट्रानें कृतज्ञता व्यक्त केली आहे. हिंदुस्थानांत दारूगोळा वगैरे लढाऊ सामान तयार करण्याचे कारखाने निघत आहेत आणि त्यांचेसाठी यंत्रसामुग्री अमेरिकेंतून आणावी लागेल. तिचे पैसे देण्यास अमेरिकन डॉलरची म्हणजे अमेरिकेवरील हुंड्यांची जरूर भासेल. त्या दृष्टीनें हिंदुस्थानचा माल अमेरिकेंत वाढत्या प्रमाणांत खपणें अगत्याचें आहे. युद्धकाळामध्यें निघालेले धंदे व कारखाने युद्धसमाप्तीनंतर तग धरून राहिले पाहिजेत, ही गोष्ट येथें अत्यंत महत्त्वाची आहे.

हिंदुस्थानच्या मालकीचें चलननिधींतलें सोनें ह्या देशांतच राहणें अगत्याचें आहे. त्यापैकीं कांहीं सोनें रिझर्व्ह बँकेच्या खात्यावर बँक ऑफ इंग्लंडनें स्वतःच्या संग्रहीं ठेवलें होतें. त्याच्या उलट, बँक ऑफ इंग्लंडचें सोनें ह्या देशांत रिझर्व्ह बँकेच्या ताब्यांत होतें. ह्या दोन ठिकाणच्या सोन्याचा अलीकडे हिशेब करण्यांत आला असून हिंदुस्थानच्या मालकीचें सर्व सोनें पुन्हां रिझर्व्ह बँकेच्या संग्रहांत दाखल करण्यांत आलें आहे. आयात-निर्यात व्यापारांतील तफावत आणि ब्रिटिश सरकारच्या वतीनें ह्या देशांत खर्चलेल्या रकमांचा मिळालेला मोबदला हीं दोन्ही लंडनमध्यें हिंदुस्थानच्या खात्यावर जमा झालीं असतां इंग्लंडमध्यें हिंदुस्थान सरकारचा व्हावयाचा खर्च वजा जाऊन शिल्लक बाकी उरते तिचा विनियोग करण्याचा एक नवीन मार्ग चोखाळण्यांत आला आहे. हिंदुस्थान सरकारच्या स्टर्लिंगमधल्या कर्जाचे रोखे लंडनमध्यें धारण केले जात आहेत. त्यांचे पैसे देऊन टाकून त्यांच्या जागीं हिंदी कर्जरोखे ह्या देशांत काढणें हा तो मार्ग आहे. रिझर्व्ह बँकेनें चालू सालाच्या पहिल्या सहामाहींत सुमारें अडीच कोटि पौंड किंमतीचे पौंड स्टर्लिंगमधले हिंदुस्थानसरकारचे कर्जरोखे विकत घेऊन तो पैसा इकडे परत आणला आहे. परदेशांत काढलेल्या कर्जावरील व्याज तिकडे पाठवावें लागल्यानें हुंडणावळीचा प्रश्न अवघड होत असतो आणि राष्ट्रीय संपत्ति देशांत न रहातां बाहेर जाते. हिंदी लोकमत ह्याच कारणानें परदेशांत कर्जें काढ-

ण्यास प्रतिकूल असें आज अनेक वर्षे आहे. अखेरीस स्टर्लिंग-मधल्या कर्जाचा पैसा हिंदुस्थानांत परत आणण्याच्या धोरणाच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाला आहे ही समाधानाची गोष्ट आहे. स्टर्लिंगमधल्या रोख्यांची खरेदी-विक्री करतांना ह्या व्यवहारांचा परिणाम रोखेबाजारावर अनिष्ट होणार नाहीं ह्याविषयीं काळजी घ्यावी लागते.

सर जेम्स टेलर ह्यांनीं आपल्या भाषणांत रुपयाच्या नाण्यांस मध्यंतरीं भलतीच मागणी येऊन त्यांची टंचाई भासूं लागली होती ह्या परिस्थितीचा निर्देश करणें अपरिहार्य होतें. चाळीस कोटि रुपये व्यवहारामधून बाहेर निघून पडून रहाण्याचा परिणाम व्यापार, उद्योगधंदे व बाजारभाव ह्यांचेवर अनिष्ट होणें साहजिक आहे असें त्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानाबाहेर चाललेल्या युद्धानें जगावर भयंकर आपत्ति आणली आहे आणि त्याची झळ ह्या देशास लागल्यावांचून रहाणें अशक्य आहे. तथापि, हिंदुस्थानची सांपत्तिक व चलनविषयक स्थिति मजबुतीची असून युद्धामधून सुरक्षितपणानें बाहेर पडण्याविषयीं आत्मविश्वास त्यांनीं प्रकट केला.

---

## हिंदी चलन व्यवस्थेचा वृत्तांत

(२)

### चलनी नोटा आणि नाणीं

रिझर्व्ह बँकेनें चलन व्यवस्थेचा १९३९-४० सालाबाबतचा वृत्तांत प्रसिद्ध केला आहे; त्यांत युद्धाचे सात महिने समाविष्ट आहेत. ह्या कारणानें त्या वृत्तांतांत युद्धाचे परिणाम चलनी नोटा व नाणीं ह्यांवर झालेले दिसून येणें सहाजिक आहे. हा वृत्तांत गेल्या मार्च महिना अखेरच येऊन पोहोंचला असल्यामुळें अगदी अलीकडच्या घडामोडींचें प्रतिबिंब त्यांत दृष्टोत्पत्तीस यावयाचें नाहीं. तथापि, युद्धपरिस्थितीची छाया चलनाच्या परिस्थितीवर पडलेली आढळल्यावांचून रहाणें शक्य नाहीं. युद्धाचा पहिला परिणाम चलनी नोटांच्या विस्तारामध्यें पहावयास सापडण्याची अपेक्षा स्वाभाविक आहे. हा विस्तार कसा होत आला आहे हें खाली दिलेल्या पांच वर्षांच्या आकड्यांवरून दिसून येईल. चलनी नोटांच्या किंमतीचे आकडे प्रत्येक वर्षाच्या अखेरच्या दिवसाचे आहेत आणि त्याच्यापुढें किती नोटा व्यवहारांत जास्त खेळल्या अथवा व्यवहारांतून रिझर्व्ह बँकेकडे परत आल्या हें दर्शवलें आहे:—

**चलनी नोटांचा खेळ**

| वर्ष | काढलेल्या एकूण नोटा | | व्यवहारांत खेळल्या | | जास्त खेळल्या(+)व्यवहारांतून परतल्या(−) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष |
| १९३५-३६ | १९५ | ५८ | १६८ | ८२ | + ५ | २६ |
| १९३६-३७ | २०८ | ०० | १९४ | ३५ | + २५ | ५३ |
| १९३७-३८ | २१४ | ०३ | १८६ | १२ | − ८ | २३ |
| १९३८-३९ | २०७ | ९३ | १८९ | १० | + २ | ९८ |
| १९३९-४० | २५२ | २१ | २३८ | ५५ | + ४९ | ४५ |

व्यापार व उद्योगधंदे ह्यांची चलती आणि मंदी ह्यांचेवर चलनी नोटा व रुपये ह्यांचें व्यवहारांत खेळण्याचें प्रमाण अवलंबून असतें. युद्धामुळें चलनास अधिक मागणी येणें स्वाभाविक आहे आणि म्हणून गेल्या सालीं फार मोठ्या प्रमाणावर नोटा व्यवहारांत खेळल्या हें उघड आहे. प्रस्तुत युद्ध चालू होण्यापूर्वीं कित्येक वर्षे आर्थिक मंदीच्या परिस्थितीमुळें देशपेठेंत रुपयांची आवश्यकता कमी होऊन रुपये सरकारी तिजोऱ्यांत आणि रिझर्व्ह बँकेकडे परत येऊं लागले. अलीकडे रुपयांची कृत्रिम टंचाई उत्पन्न होऊन ४० कोटि रुपये व्यवहारांत गडप झाले आहेत हें आम्हीं सांगितलेंच आहे. रुपये आणि चलनी नोटा व्यवहारांत किती जास्त खेळल्या किंवा व्यवहारांतून किती कमी झाल्या हें खालील आकड्यांवरून दिसेल:—

**जास्त खेळते ( + ) आणि व्यवहारांतून परतलेले ( − ) रुपये व नोटा**

| वर्ष | रुपये | | नोटा | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष |
| १९३५-३६ | − ९ | ४१ | + ५ | २६ | − ४ | १५ |
| १९३६-३७ | − २ | ४९ | + २५ | ५३ | + २३ | ०४ |
| १९३७-३८ | − ६ | ५२ | − ८ | २३ | − १४ | ७५ |
| १९३८-३९ | − १२ | ६० | + २ | ९८ | − ९ | ६२ |
| १९३९-४० | १० | ०८ | + ४९ | ४५ | + ५९ | ५३ |

गेल्या सालीं एकूण ५९ कोटी, ५३ लक्ष रुपये किंमतीची रुपयांचीं नाणीं व नोटा व्यवहारांत पूर्वीच्या वर्षापेक्षा अधिक खेळल्या. चलनांत एवढी भर एका वर्षांत १९१८-१९ ह्या साला शिवाय कधींच पडली नव्हती. १९१८-१९ ची भर ९४ कोटि रुपये होती. तुलना करण्यास सोयीचें व्हावें म्हणून गेल्या महायुद्धाच्या पंचवार्षिक मुदतीचे चलनाच्या वाढाव्याविषयींचे आकडे खालीं दिले आहेत:—

**मागील महायुद्धाच्या काळांतील आकडे**

| वर्ष | रुपये | | नोटा | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कोटी | लक्ष | कोटी | लक्ष | कोटी | लक्ष |
| १९१४ १५ | − ८ | ७० | − ६ | ०१ | − १२ | ७१ |
| १९१५ १६ | +१० | ४० | + ९ | २३ | + १९ | ६३ |
| १९१६-१७ | +३३ | ८१ | +१३ | ८९ | + ४७ | ७० |
| १९१७-१८ | +२७ | ८६ | +१७ | २२ | + ४५ | ०८ |
| १९१८-१९ | +४५ | ०२ | +४९ | २९ | + ९४ | ३१ |

मागील महायुद्धाचे वेळीं पहिल्या वर्षी १२ कोटि, ७१ लक्ष रुपयांचें नाणें व नोटा व्यवहारांतून कमी झाल्या. चालू युद्धाच्या काळांतली परिस्थिति १९३९-४० च्या शेवटच्या सात महिन्यांत कशी होती हें खालील आकडे सांगतील. तुलनेसाठी १९३८-३९ सालचेहि आकडे दिले आहेत:—

**१९३८-३९**

| | नोटा | | रुपये | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष |
| एप्रिल ते ऑगस्ट | − १४ | ७८ | − १० | ४२ | − २५ | २० |
| सप्टेंबर ते मार्च | + १७ | ७६ | − २ | १८ | + १५ | ५८ |

**१९३९-४०**

| | नोटा | | रुपये | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष |
| एप्रिल ते ऑगस्ट | − १० | २१ | − १ | ४५ | − ११ | ६६ |
| सप्टेंबर ते मार्च | + ५९ | ६६ | + १० | ५३ | + ७० | १९ |

---

## स्फुट विचार

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विषयींचे प्रश्न

मुंबई प्रांतांतील म्युनिसिपालिट्या आणि लोकल बोर्ड्स ह्यांच्या कारभारासंबंधांतील प्रश्नांचा विचार करून त्याविषयीं योग्य वाटतील त्या सूचना करण्यासाठी प्रांतिक सरकारानें एक कमिटी नेमली होती. तिचा रिपोर्ट स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकार ह्यांच्यापुढें आज नऊ महिने आहे. कमिटीच्या कांहीं शिफारसी अंमलांत आणणें सर्वस्वी त्या संस्थांच्या हातीं आहे आणि कांहीं महत्त्वाच्या बाबींची व्यवस्था सरकारास करावी लागेल. ह्या सर्व प्रश्नांचा निकाल लागण्यास कालावधि होऊं नये म्हणून प्रांतिक सरकारानें प्रातिनिधिक स्वरूपाची एक परिषद् चालू आठवड्याचे अखेर भरवून तिचें मत अजमावण्याचें ठरवलें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. उत्पन्न, करावयाचीं कामें व कारभाराची पद्धति असे तीन गट चर्चेच्या विषयांचे करतां येतील. म्युनिसिपालिट्या व विशेषतः लोकल बोर्डस ह्यांचीं उत्पन्नें वाढवल्यावांचून त्यांच्या कामाची उपयुक्तता वाढणें कठिण आहे. त्याकरितां करवाढीची कोणती तजवीज करतां येईल हें ठरवावें लागेल. तसेंच, स्थानिक स्वराज्य संस्थांस योग्य प्रमाणांत सहाय देण्याची आपली जबाबदारी प्रांतिक सरकारानें ओळखली पाहिजे. ह्या संस्थांचा कारभार कार्यक्षम आणि जनतेस हितावह होण्यासाठी त्यांमध्यें अनेक सुधारणा होणें इष्ट आहे. सभासदांची लायकी, त्यांच्या निवडणुकीची पद्धति इत्यादि अनेक प्रश्नांचा त्यांच्याशी संबंध येतो. शिक्षण, आरोग्य, औषधपाण्याची तरतूद ह्यांवर अधिक पैसा खर्चला जाण्याची आवश्यकता सर्वत्र भासत आहे. खेडेगावांतील जनतेची स्थिति ह्या बाबतींत अत्यंत असमाधानकारक आहे. ती कशी सुधारतां येईल इकडे व्यावहारिक दृष्टि फिरली पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे लोकल बोर्डस आणि म्युनिसिपालिट्या खऱ्याखुऱ्या स्वराज्य संस्था होऊन त्यांचा कारभार कार्यक्षम व प्रगमनशील होणें अगत्याचें आहे. चालू आठवड्यांत भरणाऱ्या परिषदेंत होणाऱ्या चर्चेमधून उपयुक्त सूचना बाहेर येतील आणि त्यांची अंमलबजावणी सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था उत्साहानें व निश्चयानें करतील अशी आशा आहे.

### भुइमूग, शेंगदाणा आणि आळशी

युरोपांतील बाजारपेठा बंद झाल्याकारणानें भुइमूग व आळशी ह्या हिंदुस्थानांतील गळिताच्या धान्यांच्या धंद्यावर मोठी आपत्ति आली आहे. जर्मनी, इटली, फ्रान्स, हॉलंड, बेल्जम ह्या देशांत हिंदी गळिताच्या धान्यांचा चांगला खप होत असे. तें गिऱ्हाइक युद्धामुळें तूर्त नाहींसें झालें आहे आणि त्यांची मागणी नसल्यानें बाजारभाव घसरले आहेत. देशांतल्या देशांत भुइमूग, आळशी वगैरे गळितांचें तेल काढून त्यांचा खप वाढवण्यास सवड नाहीं. तेलाचा धंदाहि भरभराटींत नाहीं आणि त्याचा विस्तार होणें फारसें शक्य नाहीं. इंग्लंडमधील अन्नसामुग्रीच्या व्यवस्थेचें सरकारी खातें बाहेरचा माल खरेदी करून त्याची साठवण करतें पण त्याच्याकडून हिंदी भुइमुगास मागणी येण्याचा तूर्त तरी रंग नाहीं. त्या खात्याचे वतीनें खरेदी झालेलीं गळितें व पेंड ह्यांचा एक लक्ष टनांचा साठा मुंबईत पडून आहे. त्यांत २३ हजार टन भुइमूग, ४९,००० टन आळशी व २६,००० टन भुइमुगाची पेंड आहे. येत्या दोन महिन्यांत ह्यांतला ४० हजार टनांपेक्षां अधिक माल उठण्याचा संभव दिसत नाहीं. ह्या मालाच्या तारणावर बँकांनीं पैसे दिले आहेत आणि भाव उतरल्यामुळें कांहीं पैसा भरण्याचा तगादा त्यांनीं व्यापाऱ्यांस लावला आहे. ह्याचा परिणाम भाव आणखी खालीं जाण्यांत होण्याची भीति वाटत आहे. मुंबई व मद्रास ह्या बंदरांतूनच शेंगदाण्याचा व्यापार मुख्यत्वेंकरून होतो. शांततेच्या काळांत दरवर्षी सुमारें साडे आठ लक्ष टन भुइमूग बाहेर जात असे. परंतु त्यांपैकी ६५ टक्के माल सध्याच्या शत्रुराष्ट्रांत खपत असे. काठेवाडच्या बंदरांत माल पडून आहे आणि मुंबई बंदराची स्थिति विशेष वाईट नसली तरी मद्रासकडे नवा हंगाम चालू झाला आहे. आळशीस मुख्य मागणी ग्रेट ब्रिटनची आणि युद्धाच्या प्रारंभापासून तेथील अन्नसामुग्रीच्या खात्यानें दीड लक्ष टन खरेदी केले आहेत. परंतु वहातुकीचीं साधनें मर्यादित असल्यामुळें ह्या मालाचाहि उठाव व्हावा तसा होत नाहीं. तथापि, हा माल लवकर खराब होत नाहीं आणि पुढच्या हंगामांत त्याच्या व्यापाराची परिस्थिति सुधारण्याची आशा वाटत आहे.

### सहकार-तत्त्व आणि व्यवहार

मुंबई येथें निघणाऱ्या, "रूरल इंडिया" ह्या इंग्लिशमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या आणि ग्रामसुधारणेच्या प्रश्नाला वाहिलेल्या मासिकाच्या चालू महिन्याच्या अंकांत सहकारी संस्थांचीं तत्त्वें आणि व्यवहार ह्यांचें विवेचन करणारा प्रो. काळे ह्यांचा एक लेख आला आहे. उत्पादनाचीं व प्राप्तीचीं साधनें उपलब्ध नसल्यानें व्यवहार व चरितार्थ चालवण्यास ज्यांस अडचण भासते अशा लोकांनीं परस्पर सहाय्यानें आपलें आर्थिक बळ वाढवणें आणि धंदा सुधारून तो फायदेशीर करणें ह्यास सहकार म्हणतात, अशा आशयाची व्याख्या लेखकानें प्रथम दिली आहे. परस्परहिताच्या दृष्टीनें एकजुटीनें व्यवहार करण्याचें तत्त्व दिसावयास सोपें दिसतें आणि हिंदुस्थानांतील सहकारी संस्था त्याचें पालन करून यशस्वी कां होत नाहींत ह्याचें अनेकांस आश्चर्य वाटतें. ह्या संस्थांची घटना आणि नियम हीं वरील तत्त्वावर आधारलेलीं आहेत. परंतु त्यांची अंमलबजावणी अपेक्षेप्रमाणें पद्धतशीर रीतीनें व काटेकोरपणानें केली जात नाहीं, असें प्रो. काळे ह्यांचें म्हणणें आहे आणि हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीस अपेक्षेप्रमाणें यश न येण्याचें तें पुष्कळांशीं कारण आहे असा त्यांचा अभिप्राय आहे. सहकारी पतपेढ्यांचें उदाहरण घेऊन त्यांच्या सभासदांचे हातून कर्जें देणें, त्यांच्या उपयोगावर नजर ठेवणें, वेळेवर वसूली करणें, काटकसरीस उत्तेजन देणें इत्यादि बाबतींत सहकारी पद्धतीनें वर्तन होत नाहीं हें त्यांनीं दाखवलें आहे. सहकारी संस्था स्थापन केली कीं काम झालें, पुढें तिच्या व्यवहारासंबंधानें विशेष काळजी घेण्याची आवश्यकता नाहीं असें अनेक लोकांस वाटतें. सभासदांमध्यें स्वतःची नैतिक जबाबदारी व व्यावहारिक रीतीनें निक्षून वागण्याचें अगत्य ह्यांची जाणीव पुसट होते; नियम नांवास पाळले जातात आणि शिस्तीचें व व्यवहाराचें शिक्षण सारखें चालू राहिलें पाहिजे तें रहात नाहीं. मन लावून कार्य करणाऱ्या आणि निरपेक्ष वृत्तीच्या पुढाऱ्यांचा अभाव सहकारी संस्थांमध्यें दिसून येतो. ह्या प्रकारच्या पुळपुळीत सहकारित्वापेक्षा ढळढळीत व्यक्तिस्वार्थ बरा असें अनेक वेळां वाटूं लागतें. सहकारी चळवळींतून हे दोष नाहींसे व्हावे ह्या उद्देशानें प्रो. काळे ह्यांनीं त्यांचिकडे ठळकपणानें लक्ष वेधलें आहे. सह-

काराची कास धरल्यावांचून ग्रामसुधारणेचें कार्य यशस्वी व्हावयाचें नाहीं, ह्यांत संशय नाहीं. असें आहे तर नवीन सहकारी संस्था काढतांना व चालवतांनां सावधगिरी बाळगली गेली पाहिजे हें ओघानेंच प्राप्त होतें. तसेंच, सध्या अस्तित्वांत असलेल्या सहकारी संस्थांची पुनर्घटना शुद्ध तात्त्विक आणि व्यावहारिक अशा दुहेरी पायावर होणें आवश्यक आहे हें सांगावयास नको. वरील गोषवाऱ्यावरून प्रो. काळे ह्यांच्या लेखाचें रहस्य ध्यानांत येईल.

---

## जर्मनीची व्यर्थ बढाई

इंग्लंडच्या व्यापाराची नाकेबंदी केल्याविषयीं जर्मनी बढाई मारीत आहे. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं अमेरिकेंतून १,७०० जहाजें इंग्लंडला माल नेत आहेत आणि वहातुकीचीं विपुल साधनें त्या देशापाशी आहेत. इंग्लंडनें अमेरिकेंत ८०० कोटि रुपयांच्या मालाच्या ऑर्डरी आजपर्यंत दिल्या आहेत. त्यांतल्या निम्या लढाऊ विमानांबद्दलच्या आहेत.

---

## सुएझ कालव्याची किल्ली ब्रिटिशांच्या हातांत

अलीकडे एडनच्या आखातावरील ब्रिटिश सोमालीलँडवर इटालिअन फौज चाल करून जात असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. ॲबिसिनियांतली आपली सत्ता सुरक्षित करून तांबड्या समुद्राच्या दक्षिणेकडील तोंडावर असलेल्या एडन ह्या ब्रिटिशांच्या मोक्याच्या ठिकाणास धोक्यांत आणणें हा या इटालियन प्रयत्नाचा हेतु आहे हें उघड आहे. परंतु ब्रिटिश सोमालीलँडच्या बाजूच्या या हालचालींचा इटलीस विशेष फायदा होण्याचा संभव नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ही गोष्ट ध्यानांत येण्यास त्या प्रदेशाच्या भौगोलिक स्थानाची कल्पना येणें आवश्यक आहे. तांबड्या समुद्राच्या उत्तरेच्या तोंडास सुएझचा कालवा आहे आणि त्याच्या पश्चिम किनाऱ्यावर इजिप्त, ॲंग्लो इजिप्शन सुडान, इरिट्रिया, फ्रेंच जिबूटी, ब्रिटिश सोमालीलँड व अखेर इटालिअन सोमालीलँड ह्या प्रमाणें एकाखाली एक प्रदेश पसरलेले आहेत. एडनच्या आखातावरील ब्रिटिश सोमालीलँड आपल्या ताब्यांत आणून स्वतःचा त्या बाजूचा मुलूख सलग करण्याचा इटलीचा बेत आहे. परंतु ॲबिसीनिया व सोमालीलँड हे देश इटली व इटालियन लिबिया ह्यांपासून इतक्या दूर अंतरावर आहेत की ते स्वतःच्या कब्जांत ठेवणें इटलीस अवघड होणार आहे. तांबडा समुद्र व एडन ह्यांची किल्ली सुएझ कालवा ही आहे आणि ती पक्की ब्रिटिशांच्या हातीं आहे. भूमध्य समुद्रांतहि ब्रिटिश आरमाराचें वर्चस्व आहे, ह्यामुळें आपल्या आफ्रिकेमधील वसाहतींस कुमक पोचवणें किंवा त्यामध्यें लढाया चालवणें इटलीस फार वेळ शक्य नाहीं. तांबड्या समुद्रांत शिरण्याचें द्वार ब्रिटिशांच्या भक्कम सत्तेखाली आहे आणि ह्या कारणानें इटलीची त्याच्या काठच्या प्रदेशांत चाललेली गडबड फुकट आहे. ब्रिटिश लष्करी व आरमारी सत्ता तीन-चार ठिकाणीं एकाच वेळीं गुंतली जावी ह्या हेतूनें हिटलर इटलीचा उपयोग करून घेत आहे. पण त्यास किंवा मुसोलिनीस अखेर ह्या प्रयत्नांत यश येण्याचा संभव नाहीं. सोमालीलँड व एडन ह्यांच्या बाजूस चाललेल्या इटलीच्या हालचालींच्या बातम्यांपासून निष्कर्ष काय काढावयाचा हें वरील माहितीवरून उघड होईल.

---


लग्न म्हणजे निव्वळ लपंडाव

असें म्हणणाऱ्या सुशिक्षित स्त्रिया स्वतःशीच कसा लपंडाव खेळतात त्याचें हुबेहुब चित्र

नवयुग चित्र

लपंडाव

नवयुगचें प्रभावी कलाचित्र

ल पं डा व

भूमिका :
● मीनाक्षी ● वनमाला,
● विनायक ● बाबूराव पेंढारकर
● साळवी ● पवार

शनिवार ता. १७पासून सुरू

मिनर्व्हा टॉकीज

पुणें

मुंबईंत न्यू वेस्ट एण्ड सिनेमांत तुफान गर्दीचा तिसरा आठवडा

प्रकाशक : पिअरलेस पिक्चर्स, मुंबई ४

दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस

"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर, पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.

सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन मागवल्या एकदम घेणारास टपाल हशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ता—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर–Amritsar.

अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ६००, किंमत ६ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## शिक्षण पद्धतीस व्यावहारिक वळण लावा

### प्रो. काळे ह्यांचें कोल्हापुरांत व्याख्यान

नवयुग चित्रपट लि. च्या तिसऱ्या बोलपटाच्या प्रारंभ समारंभाचे प्रसंगीं उपस्थित होऊन तेथील व्यवस्थेचें निरीक्षण करण्याचे हेतूनें प्रो. काळे गेल्या आठवड्यांत कोल्हापुरास गेले होते. त्या संधीचा फायदा घेऊन स्थानिक शिक्षक ट्रेनिंग कॉलेजच्या विवादक मंडळाच्या अधिवेशनाचें उद्घाटन करण्याची विनंति मंडळाच्या अधिकाऱ्यांनीं त्यांस केली. आपल्या गडबडीच्या कार्यक्रमांत प्रो. काळे यांनीं वेळ काढून शुक्रवारीं संध्याकाळीं बी. टी. कॉलेजच्या दिवाणखान्यांत प्रिन्सिपॉल वकील ह्यांच्या अध्यक्षतेखालीं सुश्राव्य व्याख्यान दिलें. त्यांच्या भाषणाचा गोषवारा आम्हीं खालीं देत आहोंत.

शिक्षण शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या भावी व होतकरू शिक्षकांसाठीं ही संस्था उपयुक्त कार्य करीत आहे. मी स्वतः पंचेचाळीस वर्षें सर्व दर्जांच्या व वयांच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणांत घालवलीं असून शिक्षणाशीं असलेला माझा संबंध आजहि सुटलेला नाहीं. तथापि, मी शिक्षणाचें शास्त्रीय पद्धतीनें शिक्षण घेतलेलें नसल्यानें येथील विद्यार्थ्यांस उपयोगी पडेल असें कांहीं सांगतां येईल कीं नाहीं ह्याची मला प्रथम शंका वाटली. तरीहि शिक्षण संस्थेंतील शिक्षक आणि विद्यार्थी ह्यांचा परिचय होण्याची संधी घालवूं नये ह्या विचारानें मी येथें येऊन कांहीं विचार पुढें मांडण्याचें ठरवलें. कवीप्रमाणें शिक्षकहि बनविल्यानें तयार होत नाहीं; त्याच्या अंगीं उपजत गुण असावे लागतात ह्या कल्पनेंत बरेंच तथ्य असलें तरी त्या योगानें शिक्षण शास्त्राचें महत्त्व कमी होत नाहीं. अनेक पिढ्यांच्या अनुभवानें इष्ट ठरलेल्या पद्धतीनें माणसें वागतात. हिंदी शेतकरी वर्ग अशिक्षित असला तरी त्याच्या धंद्यांतले ठोकताळे पिढीजात अनुभवानें युक्त ठरलेले आहेत. ह्यावरून शेतकीस शास्त्रीय संशोधनाचा उपयोग नाहीं असें म्हणतां येत नाहीं. शिक्षण शास्त्रास हाच नियम लागू पडतो. आपल्या शिक्षणपद्धतींत अलीकडे पुष्कळ प्रगती झाली आहे, ह्याचें कारण तिच्यासंबंधांतली शास्त्रीय चर्चा व तीमध्यें सुधारणा होण्याच्या महत्त्वाची जाणीव हें आहे. पन्नास वर्षांमागील शिक्षणाची तऱ्हा आणि प्रचलित मार्ग ह्यांची तुलना केल्यास सध्याची पद्धति किती तरी प्रगतिपर आहे असें दिसून येतें. मागें कित्येक उत्कृष्ट शिक्षक होऊन गेले आणि ह्यापुढचे शिक्षण घेतलेले सर्वच शिक्षक पहिल्या प्रतीचे निघतील असें नाहीं. तथापि, शिक्षणाचा पेशा पत्करणारानें आपल्या धंद्याची जबाबदारी ओळखून आपली पद्धति व वर्तणूक ठेवली पाहिजे. शिक्षणाविषयीं आस्था व अंतःस्फूर्ती हीं त्यामध्यें नेहमीं जागृत असावयास पाहिजेत. शिक्षक हा जन्मतःच शिक्षक असावा ह्या म्हणण्याचा हाच अर्थ आहे. शिक्षणाचें तंत्र समजलें व तें आचरणांत आणलें म्हणजे चांगला शिक्षक होतो असें नाहीं. अधिकाऱ्यांनीं निश्चित केलेल्या अभ्यासक्रमांत आणि परीक्षांच्या पद्धतींत कांहीं दोष असल्याकारणानें शिक्षकांस अडचणी भासतात हें खरें आहे. तथापि, शिक्षकांनीं स्वतःच्या शिक्षण पद्धतींत जिवंतपणा राखल्यास त्या दूर करतां येणें शक्य होतें. विद्यार्थ्यांची मनोभूमिका जाणून सोप्या व व्यावहारिक रीतीनें शिकवणारा शिक्षक यशस्वी झाल्यावांचून रहाणार नाहीं. विषय विद्यार्थ्यांस कठिण व जड वाटतात ह्याचें पुष्कळ वेळां कारण शिक्षकांच्या सदोष पद्धतींत सापडतें. आपण शिक्षणाच्या व्यवसायासाठीच जन्मलों आहों ह्या बुद्धीनें शिक्षक वागतील तर त्यांस यश हटकून येईल.

मला आपणांपुढें एक जुनाच पण अलीकडे विशेष महत्त्व पावलेला व जिव्हाळ्याचा प्रश्न मांडावयाचा आहे. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या पुढील आयुष्यांत व्यावहारिक रीतीनें उपयोगी पडेल असें आमचें शिक्षण असावें कीं, त्यांस विविध प्रकारची माहिती देणें आणि निरनिराळ्या विषयांत त्यांची गति करून देणें एवढ्यासच तें मर्यादित करावें हा तो प्रश्न आहे. माझ्या समजुतीनें तरुण-तरुणींच्या प्रचलित व भावी आयुष्यक्रमास हितकर होईल अशारीतीनें अनेक विषय शिकवतां येतील व आले पाहिजेत. हस्तव्यवसायावर आधारलेली शिक्षणपद्धति चालू करण्याची कल्पना आज आपणांपुढें आहे आणि तिची चर्चाहि पुष्कळ झाली आहे. वर्धा योजनेसंबंधानें विशिष्ट मुद्यांवर प्रतिकूल मत असणारांसहि तिच्या मुळाशी असलेल्या तत्त्वास मान्यता द्यावीच लागेल. दर वर्षी हजारो विद्यार्थी आपल्या शाळा व कॉलेजें ह्यांमधून बाहेर पडत आहेत आणि त्यांच्यामध्यें बेकारी भयंकर माजली आहे. हा प्रश्न सोडवण्यास सहाय करणें हें शिक्षकांच्या कर्तव्यांत व कार्यपद्धतीमध्यें येतें का नाहीं? हा प्रश्न आज आपणांस सोडवावयाचा आहे. इतिहास, भूगोल, वाङ्मय इत्यादि विषय शिकवतांना देशाची आर्थिक स्थिति डोळ्यांपुढें ठेवून विद्यार्थ्यांच्या जीवनास व्यावहारिक वळण लागावें आणि त्यांचें व राष्ट्राचें भवितव्य सुखाचें व्हावें अशा हेतूनें योग्य शिक्षणपद्धतीचा अवलंब आपणास करतां येणार नाहीं काय? शेती, उद्योगधंदे, व्यापार इत्यादि व्यवहारांची ओळख होऊन त्यांचे संबंधांत विद्यार्थ्यांमध्यें आवड उत्पन्न करतां येणें शिक्षकांस शक्य आहे. आपल्या सभोंवार काय चाललें आहे आणि पोटापाण्याची लोकांची व्यवस्था काय आहे ह्याचें ज्ञान होण्यास शिक्षणाची मदत विद्यार्थ्यांस होणार नाहीं तर त्यांनीं शाळांत व कॉलेजांत घालवलेला काळ फुकट गेला असें म्हणावें लागेल. ह्या बाबतींतलें आपलें कर्तव्य शिक्षकांनीं ओळखलें पाहिजे.

आपल्या वादविवादक मंडळाच्या नवीन अधिवेशनाचें उद्घाटन करतांना त्या संस्थेचें महत्त्व प्रत्येकास काय आहे हें सांगणें आवश्यक आहे. ह्या मंडळाच्या कार्यांत भाग घेणाऱ्या सभासदांस अभ्यास करून आपले विचार व्यवस्थितपणानें मांडण्याची संवय होते. समयसूचकतेनें बोलणें आणि आपलें म्हणणें स्पष्टपणानें व्यक्त करणें ह्या गोष्टी शिक्षकांस महत्त्वाच्या आहेत. विद्यार्थ्यांनीं प्रश्न विचारले असतां त्यांस दाबून टाकणें केव्हांहि योग्य नसतें. शिकवण जेवढी बोजड व कंटाळवाणी तेवढी ती अधिक वजनदार व भरीव अशी कित्येक शिक्षकांची चुकीची समजूत असते. अवघड विषय सोपा करून हाताळण्याची कला शिक्षकांनीं अवश्य साध्य केली पाहिजे. प्रिन्सिपाल वकील ह्यांच्यासारख्या उत्साही व कर्तबगार मार्गदर्शकाचे नेतृत्वाखालीं तुमच्या संस्थेची व तुमची भरभराट होवो अशी मी इच्छा करतों. तुमचें कॉलेज अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावीत आहे आणि तिचा चांगला उपयोग सर्वांनीं करून घ्यावा.

प्रिन्सिपाल वकील ह्यांनीं योग्य समारोप करून प्रो. काळे ह्यांचे आभार मानले. प्रो. देशपांडे ह्यांनींहि व्याख्यात्यांचे संबंधानें स्तुतिपर उद्गार काढले.

---

### व्हाइसरॉयांनीं केलेली घोषणा

जर्मनी व इटली ह्या शत्रूंचा पाडाव करण्यासाठी इंग्लंड आणि ब्रिटिश वसाहती ह्यांचे बरोबरीनें हिंदी राष्ट्रास आपली शिकस्त करतां यावी म्हणून राज्यघटनेच्या बाबतींत साम्राज्य सरकारनें स्वराज्य घटनेच्या संबंधांत निश्चित घोषणा करून मध्यवर्ती राज्यव्यवस्थेंत हिंदी प्रतिनिधींची योजना तात्काळ करावी अशा आशयाची मागणी करण्यांत आली होती. युद्धाचे कामांत इंग्लंडला हिंदुस्थानांतून सहाय मिळत आहे, पण युद्ध यशस्वी रीतीनें तडीस नेणें हें इंग्लंडप्रमाणें हिंदुस्थानचेंहि कार्य आहे ह्याची पूर्ण जाणीव हिंदी जनतेमध्यें वास करीत आहे. हिंदुस्थानास केवळ स्वतःच्या संरक्षणार्थच नव्हे तर जर्मनीविरुद्ध युद्धांत अधिक कार्यक्षमतेनें व उत्साहानें भाग घेतां यावा म्हणून साम्राज्य सरकारानें हिंदी जनतेच्या आकांक्षा तृप्त होतील अशा रीतीनें आपलें राजकीय धोरण आखावें ह्या अपेक्षेची चर्चा कित्येक महिने चाललेली आहे. साम्राज्य सरकारच्या वतीनें व्हाइसरॉयांनीं गेल्या आठवड्यांत घोषणा केली ती ती अपेक्षा पुरी करण्याच्या हेतूनेंच करण्यांत आली. व्हाइसरॉयांनीं आजवर निरनिराळ्या पक्षांच्या पुढाऱ्यांशीं अनेक वेळां ह्या प्रश्नावर चर्चा केली असून सर्वांस सामान्यतः पसंत पडेल अशी प्रगतीची योजना आखण्याचा प्रयत्न केला असतां त्यास यश आलें नाहीं. अलीकडे सर्वच पक्षांनीं आपापल्या मागण्या, युद्धाच्या आणीबाणीच्या स्वरूपास अनुलक्षून, बऱ्याच नरम केल्या आहेत आणि सहकार्याविषयींची आपली उत्सुकता प्रकट केली आहे. ह्यामुळें व्हाइसरॉयांची घोषणा झाली आहे त्यापेक्षा अधिक निश्चित व उदारपणाची होईल असें वाटत होतें. ह्या घोषणेनें पाऊल पुढें पडण्यास सहाय होईल अशा तऱ्हेची सुधारणा साम्राज्य सरकारच्या धोरणांत झालेली आहे असें मत कित्येक हिंदी पुढाऱ्यांनीं व्यक्त केलें आहे. तथापि, व्हाइसरॉयांच्या घोषणेंत कांहीं महत्त्वाच्या बाबी अनिश्चित व अस्पष्ट आहेत, त्या निश्चित होणें आवश्यक आहे आणि अनेक पुढाऱ्यांशीं व्हाइसरॉयांनीं चर्चा चालवली आहे तीमधून समाधानकारक निर्णय बाहेर पडेल असें त्यांस वाटत आहे. सध्याची वेळ घासाघीस किंवा दिरंगाई करण्याची नाहीं असें कांहीं ब्रिटिश वृत्तपत्रें म्हणत आहेत आणि साम्राज्य सरकारनें हिंदी मागण्या पुरविण्यासाठी आणखी पुढें पाऊल टाकावें असा सल्ला देत आहेत. तडजोडीच्या वृत्तीच्या कित्येक पुढाऱ्यांचेंहि हेंच म्हणणें आहे. व्हाइसरॉयांनीं पुढाऱ्यांशीं चालविलेली बोलणीं पुरीं झालीं म्हणजे साम्राज्य सरकार आपलें हिंदुस्थानविषयक धोरण अधिक स्पष्ट व हिंदी जनतेस अधिक समाधानकारक अशा रीतीनें बनवून तात्काळ प्रसिद्ध करील अशी आशा आहे. निरनिराळ्या पक्षांनीं व्हाइसरॉयांच्या घोषणेचा विचार काळजीपूर्वक व शांतपणानें करण्याचें ठरविलें आहे आणि लॉर्ड लिन्लिथगोहि पक्षोपपक्षांच्या पुढाऱ्यांशीं विचारविनिमय करीत आहेत हें प्रस्तुत प्रकरणीं आशाजनक आहे.

---

### स्थानिक स्वराज्य संस्था परिषद

मुंबई प्रांतांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विषयींच्या प्रश्नांची चर्चा काळे कमिटीच्या सूचनांच्या अनुरोधानें करण्यासाठी निमंत्रित प्रतिनिधींची एक परिषद् पुणें येथें कौन्सिल हॉलमध्यें येत्या १६, १७ व १८ ह्या तारखांना सरकारच्या वतीनें भरणार आहे. तिचें उद्घाटन ना. गव्हर्नर करतील आणि तिचें अध्यक्षस्थान श्री. जे. ए. मदन हे घेतील.

### शेड्यूल्ड बँकांची परिस्थिति

चालू महिन्याचे प्रारंभीं हिंदी शेड्यूल्ड बँकांची ठेवी आणि कर्जें ह्यांचे संबंधानें परिस्थिति कशी होती हें खालीं दिलेल्या आकड्यांवरून दिसून येईलः—

| | रुपये कोटि | रुपये लक्ष |
|---|---|---|
| बिन मुदत ठेवी | | |
| ( अ ) हिंदुस्थान | १४८ | २ |
| ( ब ) ब्रह्मदेश | ७ | ५७ |
| मुदत बंद ठेवी | | |
| ( अ ) हिंदुस्थान | २०२ | ३ |
| ( ब ) ब्रह्मदेश | ३ | ६२ |
| रोकड | | |
| ( १ ) हिंदुस्थान सरकारच्या चलनी नोटा | | |
| ( अ ) हिंदुस्थान | ६ | १६ |
| ( ब ) ब्रह्मदेश | | १ |
| ( २ ) ब्रह्मी नोटा | | |
| ( अ ) हिंदुस्थान | | |
| ( ब ) ब्रह्मदेश | | ४६ |
| ( ३ ) रुपयाचें नाणें | | |
| ( अ ) हिंदुस्थान | १ | ६ |
| ( ब ) ब्रह्मदेश | | १ |
| ( ४ ) किरकोळ नाणें | | |
| ( अ ) हिंदुस्थान | ० | ३६ |
| ( ब ) ब्रह्मदेश | | |
| रिझर्व्ह बँकेकडे शिल्लक | २८ | ४९ |
| दिलेलीं कर्जें | | |
| ( अ ) हिंदुस्थानांत | १२३ | ६४ |
| ( ब ) ब्रह्मदेशांत | ४ | २९ |
| डिस्कौंट केलेलीं बिलें | | |
| ( अ ) हिंदुस्थान | २ | ६६ |
| ( ब ) ब्रह्मदेश | | ९ |

---

### ब्रिटिश युद्ध कर्ज आणि जनतेची बचत

इंग्लंडमधील सामान्य जनतेची आणि विशेषतः कामकरी वर्गाची तेथील युद्ध कर्जास मोठी मदत होत आहे. वॉर सेव्हिंग्ज सर्टिफिकिटांत ( प्रत्येकाची किंमत १५ शिलिंग ) आतापर्यंत सुमारें १७५ कोटि रुपये गुंतवले गेले आहेत.

### विमानांच्या इंजनांचें वंगण हिंदुस्थानांत तयार होणार

विमानांतील इंजनांस लागणारें वंगणाचें तेल हिंदुस्थानांतील कारखान्यांत तयार करण्यासाठी खास यंत्रसामुग्री उभी करण्याचें ठरलें आहे.

---

### हिंदी गव्हाच्या पिकाचा अंदाज

चालू वर्षाचा हिंदी गव्हाच्या पिकाचा शेवटचा अंदाज प्रसिद्ध झाला आहे. ३ कोटि ४० लक्ष एकरांत १ कोटि टन निपज होईल असा अजमास आहे. गेल्या वर्षाच्या मानानें पिकाचें क्षेत्र ४ टक्के कमी आहे पण उत्पादनांत ८ टक्के वाढ आहे.

## जपानी रेशीम

रेशमाचा धंदा जपानमध्यें फार पुरातन काळापासून महत्त्वाचा गणला जाती. राजाश्रयं आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराची सुलीं द्वारें कच्च्या रेशमाच्या उत्पादनास उत्तेजक ठरलीं. जागतिक उत्पादनांतील ८० टक्के कच्च्या रेशमाची पैदास जपानांत होते.

जपानांतून ४५ ते ५० हजार गाठींची दर वर्षी निर्गत होते. त्यांची किंमत एकंदर जपानी निर्गतीच्या ३८ टक्के होते. यावरून राष्ट्राच्या आर्थिक योजनेंत कच्च्या रेशमाचें स्थान किती महत्त्वाचें आहे याची कल्पना येईल. बहुतेक सर्व रेशीम–८० ते ९० टक्के–अमेरिकेंत जातें. हें प्रमाण अमेरिकेंतून जपानांत येणाऱ्या कपाशीच्या बरोबर येतें.

रेऑनचा प्रसार झाल्यापासून रेशमाच्या व्यापारास कांहींसा धक्का बसला असला तरी निरनिराळे पायमोजे, गंजिफ्राक, शर्टस वगैरेकरितां रेशमाचा उपयोग अधिकाधिक केला जाऊं लागला आहे. शेकडा ७० टक्के रेशीम पायमोजे करण्यांत खर्च होतें तर ३० च टक्के इतर गोष्टींकरितां उपयोग केलें जातें. अमेरिकेंत शंभरांतील ९९ पायमोजे अस्सल रेशमाचे करतात. ह्याचें कारण असें कीं, रेऑनमध्यें रेशमाचा सफाइदारपणा, टिकाऊपणा आणि चिवटपणा ( elasticity ) कमी असतो; आणि याबाबत अमेरिकन स्त्रिया फार चोखंदळ असतात. अमेरिकेच्या अस्सल रेशमाच्या मागणीचा पुरवठा करण्याचा विचार आणि प्रयत्न जपानी सरकार आणि खाजगी व्यक्ति अधिकाधिक करीत आहेत.

रेशमाचे किडे पाळणें हा जपानी शेतकऱ्यांचा रिकामपणाचा महत्त्वाचा उद्योग आहे. वसंताच्या सुरवातीस अंड्यीं फुटून लहान काळे किडे बाहेर पडतात. तुतीच्या पानांवर वाढत असतां त्यांचा रंग हळुहळू पांढरट दुधाळ होत होत पुढें स्फटिकासारखा पारदर्शक होतो. ह्या सुमारास किड्यांना स्वच्छ, कोरड्या गवत्याच्या घरट्यांत ठेवण्यांत येतें. तेथेंच त्यांची ( Cacoons ) स्वतःभोंवती रेशमी धागा गुंडाळण्याची क्रिया सुरू होते. रेशमी किडे पाळणारीं अशीं सुमारें २० लक्ष कुटुंबें जपानांत आहेत. पुढें निरनिराळीं स्थित्यंतरें होऊन कच्चें रेशीम तयार होतें.

रेशमाच्या तेजी–मंदीच्या भावावर इतक्या प्रचंड जपानी शेतकरी वर्गाचें भवितव्य अवलंबून असतें. त्यावरोबरच ह्या कच्च्या रेशमापासून पक्का तयार माल करणाऱ्या सुमारें १ लक्ष २० हजार अमेरिकन गिरणी-कामगारांचें पोट रेशमाच्या मागणीच्या चढ–उतारावर अवलंबून आहे.

रेशमी कापड तयार करण्याचा धंदाहि जपानांत महत्त्वाचा समजला जातो. १९३९ मध्यें ३७ कोटि चौरस वार रेशमी कापड तयार झालें; पैकी जवळ जवळ ६ कोटि चौरस वार परदेशीं रवाना झालें.


कापसापासून तयार केलेलें कापड वापरण्याबाबत जपानांत कांहीं नियम ( restrictions ) करण्यांत आले त्यामुळें रेशमी कापडाचा उठाव अधिकच झाला. दक्षिण अमेरिका व ऑस्ट्रेलियाकडून मालास चांगली मागणी असते. ह्या वर्षी रेशमी कापडाच्या पॅरॅशूटच्या उपयुक्ततमुळें अमेरिकेची मागणी वरीच वाढली आहे.

जपानी रेशमी कापडाची निर्गत "जपानीज युनिअन ऑफ सिल्क टेक्स्टाईल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन" च्या तर्फे होत असते. निर्गत मालाची तपासणी, धंद्यावर एकंदर ताबा; संशोधन वगैरे महत्त्वाच्या गोष्टी हा संघ करीत असतो. अमेरिकेस १ कोटि, ३ लक्ष, ग्रेट ब्रिटनला १ कोटि, हिंदुस्थानांत ८५ लक्ष, मॉच्युकुओंत ४८ लक्ष चौरस वार हे जपानी रेशमी कापडाच्या निर्गतीचे १९३९ चे ठळक आकडे आहेत.


# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट

१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर




लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. सन्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७५७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ४५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारांस सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हशील माफ.

पत्ताः—अमेरिकन पिस्तुल कंपनी,
पोस्ट बॉक्स नं. २७ ( A. P. ) अमृतसर (India.)

## युद्धाची हालहवाल

सध्या इंग्लंडला दोन शत्रूंशीं एकाच वेळीं दोन निरनिराळ्या रणक्षेत्रांत लढावें लागत आहे. फ्रान्स इंग्लंडपासून फुटल्यानंतर जर्मन फौजांची स्वारी ब्रिटनवर लवकरच होईल असें वाटत होतें. ब्रिटिश सरकार आणि जनता ह्या स्वारीची अपेक्षा करून स्वरक्षणाच्या जय्यत तयारींत आहे. ब्रिटिश बेटांचा एक अभेद्य किल्लाच बनवण्यांत आला असून जर्मनीच्या वाटेल त्या हिकमतींस तोंड देण्याची इंग्लंडची पूर्ण सिद्धता आहे. हिटलर, इंग्लंडच्या स्वारीची योजना आखीत असून ती सर्व बाजूंनीं पूर्ण झाली म्हणजे हल्ल्यास प्रारंभ होईल अशी अटकळ बांधण्यांत आली आहे. अलीकडे जर्मन विमानें इंग्लंडच्या किनाऱ्यांवरून चारी दिशांनीं उड्डाण करून वाढत्या प्रमाणांत साधेल तेथें बाँब टाकीत आहेत. ह्या जर्मन हल्ल्यांचा योग्य परामर्श ब्रिटिश तोफा व विमानें घेत असून शत्रूस अपयश पदरीं बांधूनच परत जावें लागत आहे. जर्मनीचा दुसरा प्रयत्न ब्रिटिश व्यापारी जहाजांविरुद्ध चालला आहे. इंग्लंडच्या व्यापाराची नाकेबंदी करून ब्रिटिश जनतेची अन्नाची व युद्धाची सामुग्री तोडण्याची ही खटपट आहे. नॉर्वेपासून स्पेनपर्यंतच्या सबंध किनाऱ्यावरचीं बंदरें जर्मनीच्या ताब्यांत गेल्या कारणानें शत्रूच्या चाचेगिरीस थोडें उत्तेजन मिळालें आहे. तथापि, ब्रिटिश आरमारी संरक्षक शक्ति इतकी प्रचंड आहे कीं शत्रूस ह्या बाबतींत म्हणण्यासारखें यश मिळण्याची आशा नाहीं.

ब्रिटिश विमानें जर्मनीच्या आकाशयानांचे हल्ले परतवूनच थांबलीं नाहींत. त्यांचीं जर्मनी व शत्रूच्या ताब्यांतील शेजारचे देश ह्यांवर प्रत्यही उड्डाणें चालू असून त्यांनीं त्यांच्या युद्धसाधनांचा संहार चालवला आहे. हे आघात जर्मनीस जाणवत असलेच पाहिजेत. तेलाचे साठे, विमानगृहें, दारुगोळ्याचे कारखाने, रेलवेज, गोद्या ह्यांच्यावर ब्रिटिश विमानें बाँबगोळ्यांचा सारखा वर्षाव करीत आहेत. जर्मनीनें इंग्लंडवर करावयाच्या स्वारीची योजना आखली आहे, तिच्या अंमलबजावणीस ब्रिटिश विमानांच्या हल्ल्यामुळें व्यत्यय येत असला पाहिजे. म्हणूनच ही मोठ्या प्रमाणावरील स्वारी लांबत आली असावी असा तर्क करण्यास जागा आहे. ह्या अवधीचा इंग्लंडला फायदा मिळत आहे आणि ब्रिटिश लोकांस बचावाची अधिक तयारी करण्यास तिचेपासून अवसर सापडत आहे. ब्रिटिश सरकार व जनता शत्रूस निश्चयानें व धिमेपणानें तोंड देण्यास तयार आहे. शत्रूच्या सर्व डावपेचांचा योग्य परामर्श घेण्याचें सामर्थ्य त्या राष्ट्रामध्यें आहे.

हिटलरचा दुसरा डाव मुसोलिनीच्या करवीं पूर्वेच्या बाजूस ब्रिटिश आरमार आणि फौजा ह्यांस शह देण्याचा आहे. सोमालीलँडच्या बाजूस इटलीनें हालचाली चालवल्या आहेत त्यांच्या स्वरूपाचें विवेचन आजच्या अंकांत स्फुट विचारांत आम्हीं केलें आहे. जपान सध्याची संधी साधून चीनच्या बाजूस आपलें घोडें पुढें दामटीत आहे. ही गोष्ट जर्मनीच्या पथ्यावर पडण्यासारखी आहे. जपानला जर्मनीची चिथावणी पाहिजेच असें नाहीं. जपानच्या अरेरावीमुळें प्रक्षुब्ध होऊन पूर्व एशियांत युद्ध मांडण्याची चूक ब्रिटिश मुत्सद्दी करीत नाहींत आणि जपानी चढाईस ते शांत वृत्तीनें तोंड देत आहेत. भूमध्य समुद्रांत ब्रिटिश आरमाराचें प्राबल्य कायम आहे आणि इटलीचें त्याचेपुढें कांहीं चालत नाहीं. ब्रिटिश विमानांचे इटालिअन ठाण्यांवर आफ्रिकेंत हल्ले यशस्वी रीतीनें चालले आहेत. अमेरिकन सरकारनें ग्रेट ब्रिटनला अधिक मोठ्या प्रमाणावर सहाय्य द्यावें आणि अशा रीतीनें स्वतःच्या संरक्षणाची तयारी करावी अशा अर्थाच्या सूचना प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांस करण्यांत आल्या आहेत आणि त्या चालू युद्धाच्या दृष्टीनें उत्तेजनकारक आहेत.

## मुंबईच्या बाजारांतील घडामोडी

गेल्या आठवड्यांत नाणें बाजाराच्या परिस्थितींत फारसा फरक झाला नाहीं. पैशाचा पुरवठा भरपूर होता आणि कॉलमनीचा दर एक चतुर्थांश टक्का होता. मुदतीच्या ठेवींवरच्या व्याजाच्या दरांतही बदल झाला नाहीं. एक महिन्यास अर्धा टक्का, दोन महिन्यांस पाऊण टक्का व तीन महिन्यांस एक टक्का असे हे दर होते.

***

पैशाचा पुरवठा विपुल असल्यानें सरकारी ट्रेझरी बिलांस चांगली मागणी होती आणि त्यांचे संबंधांतील चढाओढीमुळें बिलांवरील व्याजाचा दर द. सा. द. शे. १५ आण्याचा १२ आणे ११ पैवर उतरला. मद्रास सरकारचीं तीन महिने मुदतीचीं ट्रेझरी बिलें बाजारांत आलीं आहेत. आणि त्यांत पैसा गुंतवण्यास सवड उपलब्ध झाली आहे.

***

हुंडणावळीच्या व्यवहारांत म्हणण्यासारखी हालचाल झाली नाहीं. हुंड्यांस व्यापाऱ्यांची विशेष मागणी नव्हती.

***

गेल्या आठवड्याचे प्रारंभीं चांदीचा बाजार स्तब्ध होता. पण पूर्व एशियांतील क्षुब्ध वातावरणाच्या योगानें कांहीं खरेदीदार पुढें आले आणि त्यांच्या मागणीचा परिणाम चांदीचा भाव ६३ रु. ८ आण्यांवर ( १०० तोळ्यांस ) जाण्यांत झाला. शेवटीं तो ६३ रु. ४ आण्यांच्या सुमारास स्थिरावला.

***

सोनेंबाजार जवळ जवळ शांत होता. तोळ्यास ४१ रु. ११ आण्यांच्या आसपास त्याचा भाव घुटमळत होता. सॉव्हरिन्सची किंमत सुमारें २८ रु. ३ आणे होती.

***

रोखेबाजारांत सांगण्यासारखी चलबिचल झाली नाहीं आणि त्याची प्रवृत्ति मंदीची होती असें म्हणावयास हरकत नाहीं. ३½ टक्क्यांच्या नोटेचा भाव ८९ रु. १४ आणे असेरीस झाला. ४ टक्के ( १९६०–७० ) रोख्यांचा भाव १०४ रु. १० आणे आणि करमाफ ५ टक्के ( १९४५–५५ ) रोख्यांचा ११० रु. ७ आणे असा होता.

***

शेंगदाण्याचा भाव बराच घटलेला आहे आणि २९ रु. १२ आणे खंडी दरानें कांहीं माल विकला. तथापि, भावाची प्रवृत्ति दोन-तीन रुपयांनीं खालीं जाण्याकडे स्पष्ट दिसून आली. भुइमुगाच्या पेंडीचा भाव ३५ रुपये होता. एरंडीचा भाव ३५ रुपयांचे सुमारांत होता. सरकीचा भाव २५ रुपयांच्या आसपास राहिला. पुढच्या मुदतीचे दर ह्यासाली घसरले. आळशीचा दर ५ रु. ९ आणे आणि ५ रु. १२ आणे ह्यांचेमध्यें वावरला.

***

जाव्हा साखरेचा भाव सर्वेवर साठी ८ रु. १२ आणे होता. हिंदी साखरेचा भाव ( सामान्य ) १४ रु. १० आणे ते १५ रु. १३ आणे हंड्रेडवेट होता. मोठ्या दाण्याचा भाव १४ रु. १४ आणे ते १५ रु. १२ आण्यांपर्यंत होता.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) ... ... | ११०—५ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४–१० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ८९—९ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०१–११ |
| ३% (१९६३–६५) ... ... ... | ९०—४ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९५–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | १०३—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १०२—८ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) ... ... | १०७—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | ११८—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% ... ... | १३५—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०४—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% ... | ३५—८ |
| इंपिरिअल बँक (५००) १२% ... ... | १४७०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक (५०) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १०१—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४०–११–० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६३—४–० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) ११% ... ... | १२५—४ |
| कराची (१००) ९% ... ... ... | १९५—० |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १३१७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १५२०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४½% ... ... | ९३—० |
| पाचोरा–जामनेर (१००) २% ... ... | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | १०२२—८ |
| तापी व्हॅली (५००) ८½% ... ... ... | ७५७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) ७ रु. ... ... ... | २००—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. ... ... | ४६—४ |
| शिंदिया स्टीम (१५) १ रु. ... ... ... | १८–१४ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. ... | ३७—४ |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ... | ३३८५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% ... ... | २०८–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) १८ रु. १० आ. ... | १४६—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. ... ... | ३४४—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ७५ रु. ११ आ. ३ पै. ... | १७८५—० |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. ... | ११३—० |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती (जि. पुणें) | १६ अकलूज (जि. सोलापूर) |
| २ सातारा („ सातारा) | १७ विरमगांव („ अहमदाबाद) |
| ३ इस्लामपूर („ „) | १८ धुळें („ प. खानदेश) |
| ४ कऱ्हाड („ „) | १९ दोंडाईचें („ „) |
| ५ तासगांव („ „) | २० शिरपूर („ „) |
| ६ किर्लोस्करवाडी („ „) | २१ शहादें („ „) |
| ७ शिराळें („ „) | २२ नंदुरबार („ „) |
| ८ कोरेगांव („ „) | २३ साक्री („ „) |
| ९ वाई („ „) | २४ शिंदखेडें („ „) |
| १० अहमदनगर („ अहमदनगर) | २५ तळोदें („ „) |
| ११ शेवगांव („ „) | २६ मालेगांव („ नाशिक) |
| १२ कोपरगांव („ „) | २७ सटाणा („ „) |
| १३ भिवंडी („ ठाणें) | २८ कळवण („ „) |
| १४ पालघर („ „) | २९ दोहद („ पंचमहाल) |
| १५ कल्याण („ „) | ३० कालोला („ „) |

## खेळतें भांडवल रु. २००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.




एजंटः—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७१ सदाशिव, पुणें.

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

**दुसरी आवृत्ति तयार झाली.**

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व आपाजी वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गानिवास,' भांबुर्डा घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.